# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in

---

**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 211 /2020** **दिनांक: 12/ 04/2020**

---

वाचा —
1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 160 /2020 दिनांक 31.03.2020
6. गृह मंत्रालय भारत सरकार यांचे NO.40-3/2020-DM-I(A) दिनांक 3/4/2020.
7. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 1520/प्र.क्र.25/ना.पु.-23 दिनांक 2 एप्रिल 2020
8. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला यांचे दैनंदिन अहवाल.

***आदेश***

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-19) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे दृष्टीने दिनांक 14.04.2020 चे मध्यरात्रीपर्यंत सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग झालेली व्यक्ती आढळल्या आहेत. सदर व्यक्ती शहरी व ग्रामीण भागातील वस्तीमधील रहीवासी असल्याचे निदर्शनास आले आहे.

**ज्याअर्थी,** सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचे दिनांक 13.3.2020 च्या अधिसूचनेनुसार राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवना-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपतकालिन परिस्थिती निर्माण झाली आहे. व सदर विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपतकालिन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याचे माझे निदर्शनास आले आहे. अकोला जिल्हयात कोरोना विषाणूपासून बचाव करण्याकरिता तसेच नियंत्रण करण्याकरिता पुढील प्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे असल्याची माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी,** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे आदेश पारीत करित आहे.

1. **जया क्षेत्रामध्ये कोरोना विषाणुने बाधित रुग्ण आढळले आहेत त्या क्षेत्रामध्ये Containment Plan नुसार संबंधीत क्षेत्र हे कलम 144 नुसार प्रतिबंधात्मक क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आले आहे.**
2. **या प्रतिबंधात्मक क्षेत्रामध्ये कोणत्याही व्यक्तीस मुक्त संचार करता येणार नाही.**
3. **कोणत्याही प्रकारचे वाहन चालविता येणार नाही. तसेच वाहन चालवितांना निदर्शनास आल्यास वाहन जप्त करण्याची व वाहन परवाना निलंबत करण्याची कारवाई करण्यात येईल.**
4. **या क्षेत्रातील रहिवासी यांना माहिती देणे बंधनकारक आहे. गठीत केलेल्या पथकाला सहकार्य करणे आवश्यक आहे. जो कोणी व्यक्ती सहकार्य करणार नाही त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.**

5. **प्रतिबंधीत करण्यात आलेल्या क्षेत्रामधून कोणी व्यक्ती बाहेर किंवा प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये प्रवेश करणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. याचे उल्लंघन करणा-या व्यक्तीविरुध्द कारवाई करण्यात येईल.**
6. **शहरातील जे नागरीक मास्क,रुमाल किंवा इतर न लावता शहरामध्ये फीरत आहेत अशा नागरीकांवर मास्क,रुमाल किंवा इतर न लावल्याबाबत दंड लावून दंडाचि एकरक्कमी वसूल करावा तसेच त्या बाबत संबंधीतास पोच देण्यात यावी.**
7. **एखाद्या नागरीकाडून एका पेक्षा जास्त वेळेस दंडाची रक्कम आकारण्यात आली असेल अशा नागरीकांना शहरामध्ये फीरण्याबाबत प्रतिबंध करावा.**
8. **नागरीकांना मारहाण करण्यात येवू नये या बाबत संबंधीत विभागाने आपले अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांना सूचित करावे व केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन अहवाल नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांचेकडे न चुकता सादर करावा.**

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी**

1. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशाप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.
3. अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला / जिल्हा शल्य चिकित्क अकोला
4. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
5. उपविभागीय अधिकारी-/ तहसिलदार ------------------- सर्व
6. जिल्हा नगर पालिका प्रशासन अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

७. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर बातमी जास्त खपाच्या वृत्तपत्रामधून विनामुल्य प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याकरिता.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला